# BDP / BCA / BTS

# मराठी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम

## सत्रांत परीक्षा

00654

## दिसम्बर, 2016

## पाठ्यक्रम कोड : एफ.एम.टी.-01

*वेळ : दोन तास* *अधिकतम गुण : 50*

***नोट :*** *सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*

1. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर निबंध लिहा : *10*

   (a) एकविसाव्या शतकांतील पर्यावरणाचे प्रश्न

   (b) स्त्रियांना कौटुंबिक कामांचा मोबदला मिळायला हवा

   (c) माझा आवडता लेखक

   (d) मला पंख असते तर !

2. खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा : *8*

   (a) 'संतवाणी'चे वर्णन संत तुकारामांनी कोणत्या शब्दात केले आहे, थोडक्यात लिहा.

   (b) कवी-कलावंताला सृष्टीतून वगळले तर काय होईल ?

   (c) 'कातरवेळ' या कथेच्या अखेरीस आक्काच्या बदलत्या भावस्थितीचे वर्णन करा.

   (d) चेलम्यावरील प्रसंगातून कोणत्या सामाजिक परिस्थितीचे दर्शन होते ?

3. खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे लिहा : 6

(a) कुंजा नव्या पिढीचा नायक आहे हे अखेरीस मुग्लीमायला कसे पटते ?

(b) विनोदाचे प्रकार किती व कोणते ? चिं.वि. जोशी यांच्या विनोदी लेखनात कोणत्या प्रकारची विनोदनिर्मिती आढळते ?

(c) म्हातारीने तांब्याची अंगठी मुद्दाम तात्याला हातात घालायला का लावली, ते लिहा.

(d) काळ्या कोळसेवाल्याचे वर्णन मर्ढेकरांनी कसे केले आहे, ते ओळींसह स्पष्ट करा.

4. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर टीप लिहा : 6

(a) काव्यभाषेचे स्वरूप

(b) गुंड्याभाऊंचे खरोखरीचे दुखणे

(c) 'आकाशवाणी' साठी बातमीलेखन

(d) जाहिरातीचे लाभ

5. क्रियापद, क्रियाविशेषण, शब्दयोगी अव्यय, उभयान्वयी अव्यय आणि केवलप्रयोगी अव्यय यांचे प्रत्येकी एक-एक उदाहरण देऊन त्यांचा वाक्यात उपयोग करा. 5

**किंवा**

खालीलपैकी ***एका*** कल्पनेचा सुमारे सहा ते आठ ओळींमध्ये विस्तार करा :

(a) करावे तसे भरावे

(b) जो दुसऱ्यावरी विसंबला त्याचा कार्यभाग बुडाला

(c) जे न देखे रवी, ते देखे कवी

6. खालीलपैकी कोणत्याही *तीन* वाक्प्रचारांचा अर्थ सांगा : 3

(a) एरंडाचे गुऱ्हाळ

(b) नाकी नऊ येणे

(c) सुदामा बनवणे

(d) पिंगा घालणे

(e) हबकाच बसणे

**किंवा**

खालीलपैकी कोणत्याही *तीन* म्हणींचा अर्थ स्पष्ट करा :

(a) कठीण समय येता कोण कामास येतो ?

(b) सुख पाहता जवापाडे, दुःख पर्वता एवढे

(c) गरज सरो, वैद्य मरो

(d) बाप दाखव नाहीतर श्राद्ध घाल

(e) नावडतीचे मीठ अळणी

7. खालीलपैकी कोणत्याही *एका* प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा : 4

(a) सामाजिक वनीकरणामुळे पर्यावरणात कोणकोणते बदल होतील ?

(b) नागरिकाला लाभणारे महत्त्वाचे अधिकार कोणते आहेत ?

(c) लोकशाहीच्या रक्षणासाठी डॉ. आंबेडकरांनी कोणत्या जबाबदाऱ्या सांगितल्या आहेत ?

(d) मध्यमवर्गीय स्त्रियांचे प्रश्न कोणते आहेत ?

8. खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : *4*

The folktales that are passed down from generation to generation forming part of the cultural heritage of a society do not always have the same social function. Malinowski proposed a three-way classification and distinguished between myth, legend and fairy tale. The first of these, he suggested, represents a statement of a higher and a more important truth of a primeval reality.

9. खालील उताऱ्याचा सारांश लिहा : *4*

जन्म, व्याधी, जरा आणि मृत्यू यांत जे दुःख भरले आहे, त्याच्या प्रत्ययातून बुद्धाचे आर्यसत्य साकारले आहे. अनेकांनी गौतमबुद्ध हा दुःखाचा उद्गाता, निराशेचे तत्त्वज्ञान गाणारा, म्हणून त्याला ठपका दिलेला आहे. पण जरा वर मान करा व बघा, त्या ध्यानस्थ बुद्धमूर्तीकडे. ती का निराशेची प्रतीक आहे ? नाही नाही. सनातन आशेचे चिरकोमल हास्य या मूर्तींच्या ओठावर फुटलेले आहे. काळाला ते कधीही पुसता येणार नाही. त्या मूर्तीचे नेत्र अर्धे उघडे, अर्धे मिटलेले आहेत. गंभीर आहेत आणि स्थिरही आहेत. नवविकसन आणि विनाश या दोन्ही अवस्थांच्या आंदोलनांना आणि कंपनांना स्थिर रूप देऊन बुद्धाच्या नेत्रांनी एका नव्याच अस्फुट दृष्टीने माणसाला जगाकडे पाहायला शिकविले. संसारच मुळी क्षणभंगुर आहे आणि अनंत अशा सुखाची आशाच नाही. त्यात देव नाही आणि वेदासारखी वचनेही तुम्हांला त्या दुःखातून तारू शकणार नाहीत. मग माणसाला तारते ते काय ? माणसाला तारून नेतो त्याचा आत्मप्रत्यय, त्याची विश्वाबद्दलची सत्य भावना. चराचराबद्दल व्यक्तिनिरपेक्ष प्रेम, हीच मानवी जीवनाच्या सार्थकतेची खूण. माणसाने स्वतःच्या मनावर स्वतःच नियमन करण्याचा हा महान प्रयोग गौतमाने जगाला शिकविला.